بِسْمِ اللّٰہِ الرَّحْمٰنِ الرَّحِیْم    نَحْمَدُہٗ وَ نُصَلِّی عَلٰی رَسُوْلِہِ الْکَرِیْم    وَعَلٰی عَبْدِہِ الْمَسِیْحِ الْمَوْعُوْد

لَا اِلٰہَ اِلَّا اللّٰہُ مُحَمَّدٌ رَّسُوْلُ اللّٰہِ

دفتر مجلس انصار اللہ بھارت

Office Of The Majlis Ansarullah Bharat

Mohallah Ahmadiyya Qadian-143516, Distt.Gurdaspur (Punjab) INDIA

Mob.9682536974, E-Mail :ansarullah@qadian.in    محلہ احمدیہ قادیان ۱۴۳۵۱۶ ضلع: گورداسپور (پنجاب)

# जलसा सालाना'तील (वार्षिक सम्मेलन) सेवकांना आणि अभ्यागतांना महत्त्वपूण परोपदेश

सारांश प्रवचन खुतबा हजरत मिर्जा मसरूर अहमद, मसीहाचे पंचम खलीफा (अल्लाह त्यांचा सहाय्यक असो) दिनांक २८ जुलाई, हदीकतुल महदी आलटन २०२३,

أَشْهَدُ أَنْ لَا إِلٰهَ إِلَّا اللّٰهُ وَحْدَهُ لَا شَرِيكَ لَهُ وَأَشْهَدُ أَنَّ مُحَمَّدًا عَبْدُهُ وَرَسُولُهُ أَمَّا بَعْدُ فَأَعُوذُ بِاللّٰهِ مِنَ الشَّيْطٰنِ الرَّجِيْمِ. بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ. اَلْحَمْدُ لِلّٰهِ رَبِّ الْعٰلَمِيْنَ. الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ. مٰلِكِ يَوْمِ الدِّيْنِ. إِيَّاكَ نَعْبُدُ وَإِيَّاكَ نَسْتَعِيْنُ. اِهْدِنَا الصِّرَاطَ الْمُسْتَقِيْمَ. صِرَاطَ الَّذِيْنَ أَنْعَمْتَ عَلَيْهِمْ غَيْرِ الْمَغْضُوْبِ عَلَيْهِمْ وَلَا الضَّآلِّيْنَ.

तशहहुद, तआवुज आणि सुरह फातिहा नंतर हुजूर अनवर म्हणालेः

सर्वशक्तिमान अल्लाहच्या कृपेने आजपासून जमाअत अहमदिया यू.के.चा (जलसा सालाना) वार्षिक सम्मेलन सुरू होत आहे. खिलाफतच्या उपस्थितीत दरवर्षी येथे जलसा सालाना होऊन जवळपास चार दशके उलटून गेली आहेत. सुरुवातीला, व्यापक व्यवस्थेमुळे, इथल्या स्थानिक जमाअतला खूप काही शिकवण्याची गरज होती, त्यासाठी हजरत खलिफातुल मसीह चतुर्थ यांनी वैयक्तिक स्वारस्याने मार्ग काढला आणि रबवाह येथील लोकांना देखील शिकवण्यासाठी आमंत्रित केले, ज्यात आदरणीय चौधरी हमीदुल्लाह साहब, अधिकारी जलसा सालाना यांचा देखील समावेश होता, त्यांनी खूप मदत केली. १९८५ मध्ये जेव्हा खलिफाच्या उपस्थितीत येथे पहिला जलसा झाला, जरी त्यापूर्वी १९८४ मध्ये सम्मेलन झाला असला तरी तो फारच छोटा होता, १९८५ मध्ये कदाचित पाच हजार लोक सामील झाले होते. या सगळ्यांचा बंदोबस्त कसा करायचा, याची चिंता व्यवस्थापनालाही होती. आता तर उपसंस्थांच्या सोहळ्यात यापेक्षा अधिक हजेरी असते आणि या सर्वांचे पाहूणचार या उपसंस्था अतिशय कार्यक्षमतेने सांभाळतात. या दृष्टिकोनातून, यू.के जमाअत खूप अनुभवी झाली आहे, परंतु आता तीन-चार वर्षांनी पुन्हा मोठ्या प्रमाणात सम्मेलन होत असल्याने, आम्ही चाळीस हजारांहून अधिक अपेक्षित उपस्थिती हाताळू शकतो का की नाही, याबद्दल व्यवस्थापन थोडेसे चिंतेत आहेत. परंतु अल्लाहच्या कृपेने येथील कर्मचारी सर्व व्यवस्थापन अतिशय चांगल्या पद्धतीने हाती घेतील अशी मला आशा आहे.

गेल्या रविवारी मीही तोपर्यंत झालेल्या कामांचा आढावा घेतला, अल्लाहच्या कृपेने मला प्रत्येक विभागातील कामगार अत्यंत मेहनती आणि कामाची जाण असलेले दिसले. त्यावेळी जी चिंता होती ती सर्वशक्तिमान अल्लाहने दूर केली. अल्लाह आपल्याकडून या चिंता नेहमी काढून टाकेल पण त्यासाठी आम्ही त्याचे आशीर्वाद आत्मसात करणारे होवू. आमचे कार्य आमच्या कोणत्याही बुद्धिमत्तेने किंवा अनुभवाने होत नाही, तर केवळ सर्वशक्तिमान अल्लाहच्या कृपेने होतात.

मागील प्रवचनात मी कर्मचाऱ्यांचे लक्ष याकडेही वेधले होते की प्रत्येक कामगाराने आणि प्रत्येक पर्यवेक्षकाने कठोर परिश्रम, उच्च नैतिकता आणि प्रार्थना यांच्याद्वारे अल्लाहची मदत मागून आपापले कर्तव्य पार पाडावेत. मी पुन्हा कार्यकर्त्यांना विनंती करतो की, जितके दिवस तुम्हाला सेवेचा गौरव प्राप्त होत आहे आणि ज्याभावनेने तुम्ही सर्वांनी या कर्तव्यांसाठी स्वतःला अर्पण केले आहे, तितके दिवस संपूर्ण त्यागभावना, कर्तव्यपालन आणि आज्ञाधारकपणे डयूटी करा. त्याचप्रमाणे कर्तव्यासोबतच नमाज अदा करण्याकडेही नेहमी लक्ष वेधून राहा. तुमच्या नमाजांचे रक्षण करा, तुमचा आत्मा शुद्ध करण्याचा प्रयत्न करा. यासोबत मी आज सम्मेलनात आलेल्या पाहुण्यांना देखील काही गोष्टी सांगणार आहे.

पहिली आणि सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे हजरत अपेक्षित मसीह (अ.स.) च्या सम्मेलनात सर्व सहभागींनी हे नेहमी लक्षात ठेवावे की हा सम्मेलन काही सांसारिक उत्सव नाही. या सम्मेलनात सामील होण्यामागे आमचा एक उद्देश आहे आणि तो उद्देश आध्यात्मिक आणि नैतिक परिस्थिती प्रगती करण्याचा आहे; अल्लाह आणि त्याच्या प्रेषिताशी प्रेमसंबंध वाढवण्याचा आहे. जर आमचे लक्ष या गोष्टींकडे असतील तेव्हा व्यवस्थेतील काही किरकोळ त्रुटींकडे आपले लक्ष जाणार नाही.

सम्मेलनातील प्रत्येक सहभागीने जलसा चालू असताना इकडे तिकडे न फिरता कार्यक्रमाचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा. मध्यांतरामध्ये रिकामा असलेल्या वेळेचा अधिक चांगला वापर करा, बाजारात खरेदीला जाऊ नका, तर पुस्तकांच्या स्टॉलवर जा. केंद्रीय विभागातर्फे स्थापित करण्यात आलेल्या प्रदर्शनांना भेट द्या आणि तुमचे धार्मिक आणि ऐतिहासिक ज्ञान वाढवा. एवढ्या मोठ्या आणि तात्पुरत्या व्यवस्थेत अजूनही कमतरता राहिल्या आहेत, त्यामुळे त्याकडे दुर्लक्ष केले पाहिजे. उदाहरणार्थ, जेवणाची व्यवस्था आहे. जर तुम्ही वेळेवर अन्नासाठी पोहोचू शकत नसाल तर जे उपलब्ध आहे ते भोजन करावे. जर भाकरी कच्ची किंवा जळलेली असेल तर ती अत्यंत परिस्थितीत सोडली जाऊ शकते, अन्यथा ती खावी. वाहतूक व्यवस्थेत काही तक्रारी आहेत, यामध्ये प्रशासनासोबत सहकार्य करावे. उच्च नैतिकता दाखवणे, चांगली वागणूक दाखवणे, हसत-खेळत एकमेकांना भेटणे, इतरांसाठी त्यागाची भावना दाखवणे हे केवळ सेवकांचे कर्तव्य नाही, तर अभ्यागतांचे देखील काम आहे. जर नैतिकतेचाच अभाव असला तर बाकी साऱ्या गोष्टी निरर्थक आहेत. मागे मी एक हदीस प्रस्तूत केली होती की, स्मित करणे हा देखील विश्वासाचा भाग आहे, (एक प्रकारचा) अनुदान आहे.

हजरत अपेक्षित मसीह (अ.स.) म्हणतातः जोपर्यंत त्याचे हृदय कोमल होत नाही, जोपर्यंत तो स्वत:ला इतरांपेक्षा कनिष्ठ समजत नाही आणि सर्व खोटेपणा दूर होत नाही तोपर्यंत तो खरा श्रद्धावंत म्हणवला जाऊ शकत नाही. राष्ट्राचे सेवक असणे हे मखदूम असण्याचे लक्षण आहे. गरिबांशी नम्रपणे आणि नतमस्तकपणे बोलणे हे ईश्वरी मान्यतेचे लक्षण आहे. वाईटाला चांगल्याने उत्तर देणे हे सामर्थ्याचे लक्षण आहे आणि रागाला आणि कडू शब्दांना धैर्याने सांभाळणे ही अत्योच्च शूरवीरता आहे.

जर आपण या तीन दिवसात या गोष्टींचे पालन केले तर आपल्याला एक प्रकारची सवय लागेल आणि उरलेल्या दिवसातही आपण या गोष्टींचे पालन करू शकू. आपल्यापेक्षा आपल्या भावाला प्राधान्य देणे हे सामान्य नाही, ही एक अतिशय संघर्षपूर्ण कृत्य आहे. म्हणून हजरत अपेक्षित मसीह (अ.स.) म्हणाले की हे विश्वासाशी संबंधित आहे. हजरत अपेक्षित मसीह (अ.स.) म्हणतातः जर कोणी माझ्याशी कठोरपणे बोलले आणि मी त्याला त्याच प्रकारे उत्तर दिले, तर माझी स्थिती दुर्दैवी आहे. यासाठी तर प्रार्थना करणे हे सर्वात उचित मार्ग आहे. हे आहेत ते शिकवणूकी आणि पवित्र पर्यावरण जो इस्लाम स्थापित करु इच्छित आहे. एखादा रोगमुक्त झाला की दुसऱ्याचा आजार बरा करू शकतो. सर्व प्रकारचा अहंकार दूर करणे आवश्यक आहे. एकमेकांच्या चुकांकडे दुर्लक्ष करून बंधुत्वतेचे व सलामतीचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केलात, तर ज्या उद्देशासाठी येथे जमले आहेत, तो साध्य करतील.

काहीवेळा लोक रागात बिघडतात आणि मारहाणची परिस्थिती निर्माण होते. जर स्वतःवर नियंत्रण ठेवता येत नसेल तर सम्मेलनात येऊ नका. पार्किंगच्या संदर्भात मदत करा. जर अल्लाहची मर्जी संपादन करण्यासाठी तुम्ही हे दिवस काढलेत आणि प्रसन्नतेने सर्व त्रास उचललेत तर त्याचा मोबदला अल्लाह कोणत्या ना कोणत्या मार्गाद्वारे तुम्हाला प्रदान करेल.

समाजात शांतता आणि सुरक्षिततेचे वातावरण निर्माण करण्यासाठी आणि त्याचा प्रसार करण्यासाठी, पवित्र पैगंबर (स.) म्हणाले की, गरजूंना अन्न द्या आणि तुम्ही ज्यांना ओळखत किंवा ओळखत नाही अशा प्रत्येक व्यक्तीला शांती द्या. कोट्यावधी लोक आहेत ज्यांना भाकरी मिळाली तर निवारा नाही. अन्नहीन लोकांना अन्न देणे हा इस्लामचा आदेश आहे. किती बरे होईल जर मुस्लिम देशांनी ही वस्तुस्थिती समजून, समस्या निवारण करण्याचा प्रयत्न करतील.

पवित्र पैगंबर (स.) यांनी सलामचा सल्ला दिला आहे. तोंडाने सलाम म्हणणे पुरेसे नाही तर जेव्हा एखादी व्यक्ती मनापासून अभिवादन करते तेव्हा तो शांतता व्यक्त करण्याचा प्रयत्न देखील करतो. त्याचे दु:ख दूर करण्याचा प्रयत्न करतो. या दिवसात प्रत्येक अहमदीने शांततेचा संदेश देण्याचा प्रयत्न केला पाहिजे, सलाम करण्याला चालना दिली पाहिजे.

लोक त्यांना प्रेमाने भेटतात ज्याचा त्यांना फायदा होतो, किंवा ज्यांच्याशी त्यांचे संबंध आहेत. अंतःकरणातील क्षोभ दूर होऊन एकमेकांसाठी शांतीची प्रार्थना अंतःकरणातून होते तेव्हाच खरी शांतता आणि सुरक्षितता निर्माण होते. सम्मेलनाचे वातावरण सुरक्षिततेचे वातावरण बनले पाहिजे, लोकांच्या हक्कांना अदा करणे हा आपल्या जीवनाचा भाग झाला पाहिजे.

हुजूर अनवर म्हणाले की, सम्मेलनाचे कार्यक्रम शांतपणे आणि लक्षपूर्वक ऐका. सम्मेलनात बसा. काहींची भाषणे जल्लोष निर्माण करतायत म्हणून त्यांची भाषणे ऐकली जातात, तर काहींची नाही, ही सवय हजरत अपेक्षित मसीह (अ.स.) यांना नापसंत होती.

या शुभ दिवसात जास्तीत जास्त नामस्मरण आणि दरूद शरीफ पठन करण्याकडे लक्ष द्या. आजकाल मोहरमचे दिवस चालू आहेत. प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या आध्यात्मिक आणि भौतिक कुटुंबावर, अल्लाहच्या नावाखाली अत्याचार झाले होते. आता तेच अत्याचार प्रेषित मुहम्मद (स.)

यांच्या आध्यात्मिक कुटुंबावर आणि हजरत अपेक्षित मसीह (अ.स.) आणि त्यांच्या अनुयायींवर होत आहेत. आजकाल पाकिस्तानात खूप बिकट परिस्थिती निर्माण झाली आहे आणि ते (विरोधी) म्हणतात की ते पैगंबराच्या नावाचे रक्षण करण्यासाठी हे सर्व काही करत आहेत; परंतु आमच्या विश्वासाचा आधार पवित्र पैगंबर (स.) वर आणि त्यांच्या खातमुन्नबीय्यीन असण्यावर आणि त्यांनी आणलेल्या शरियतवर आहे. आणि पैगंबरांच्या आदेशांचे पालन करून, आम्ही हजरत अपेक्षित मसीह (अ.स.) चा स्वीकार केला आहे.

म्हणून, हजरत अपेक्षित मसीह (अ.स.) यांनी असंख्य ठिकाणी लिहिले आहे की मला जे काही प्राप्त झाले ते फक्त आणि फक्त पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या प्रेमामुळेच प्राप्त झाले आहे.

प्रवचनाच्या शेवटी हुजूर सम्मेलनाच्या संदर्भात म्हणाले की, सभामंडपातील महिलांनी समजूतदार मुलांना समजावून सांगावे की त्यांनी पूर्ण कार्यक्रम लक्षपूर्वक ऐकावं. सर्व सूचनांचे अनुसरण करा. अल्लाह अनुचितापासून आमचे रक्षण करो आणि त्याची कृपा व दया नेहमी आमच्यावर असो. आमीन.

اَلْحَمْدُ لِلّٰہِ! اَلْحَمْدُ لِلّٰہِ نَحْمَدُہٗ وَنَسْتَعِیْنُہٗ وَنَسْتَغْفِرُہٗ وَنُؤْمِنُ بِہٖ وَنَتَوَکَّلُ عَلَیْہِ وَنَعُوْذُ بِاللّٰہِ مِنْ شُرُوْرِ اَنْفُسِنَا وَمِنْ سَیِّئَاتِ اَعْمَالِنَا مَنْ یَّھْدِہِ اللّٰہُ فَلَا مُضِلَّ لَہٗ وَمَنْ یُّضْلِلْہُ فَلَا ھَادِیَ لَہٗ وَنَشْھَدُ اَنْ لَّآ اِلٰہَ اِلَّا اللّٰہُ وَنَشْھَدُ اَنَّ مُحَمَّدًا عَبْدُہٗ وَرَسُوْلُہٗ۔ عِبَادَ اللّٰہِ رَحِمَکُمُ اللّٰہُ اِنَّ اللّٰہَ یَاْمُرُ بِالْعَدْلِ وَالْاِحْسَانِ وَاِیْتَآءِ ذِی الْقُرْبٰی وَیَنْھٰی عَنِ الْفَحْشَآءِ وَالْمُنْکَرِ وَالْبَغْیِ یَعِظُکُمْ لَعَلَّکُمْ تَذَکَّرُوْنَ اُذْکُرُوا اللّٰہَ یَذْکُرْکُمْ وَادْعُوْہُ یَسْتَجِبْ لَکُمْ وَلَذِکْرُ اللّٰہِ اَکْبَرُ۔